# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २९/०१/२०२५ (बुधवार)**

---

## घरफोडी करणारा आरोपी अटक
## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई

दिनांक २५/०१/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस स्टेशन कळमेश्वर अप क्र ३४/२०२५ कलम ३३१(२) ,३०५,६२ भान्यासं चे गुन्हातील आरोपीतांचा शोध घेत असतांना सदर तपासात फिर्यादी कडून प्राप्त माहिती, सी.सी.टी.व्ही फुटेज या वरून आरोपी शोध करीत असता गोपनीय बातमीदाराकडून मिळालेल्या माहिती वरून रेकॉर्ड वरील आरोपी असलम ऊर्फ आशू अब्दुल शरीफ खान रा.यशोधरा यांनी त्याचे साथीदार रितेश वानखेडे रा.इमामवडा , आयुष लखोटे, रोहित खोब्रागडे रा.रामबाग नागपूर यांचे सह मिळुन गुन्हा केल्याचे माहिती मिळाल्याने, आरोपींचा शोध केला असता आरोपी रितेश अश्वजित वानखेडे वय २२ वर्ष पत्ता इमामवडा नागपूर हा मिळुन आला आरोपीने कळमेश्वर हद्दिमधील तेलगाव आय सी आय सी बॅक व नरखेड येथील सावरगाव भागात दुकाने व एका घरी साथीदारासह घरफोडी गुन्हे केल्याची माहीती प्राप्त झाली. आरोपीच्या ताब्यातुन १)एक टाटा आर्या वाहन क्र. एम एच २७ एआर ११११ की. २,५०,०००/— रूपये २) लोखंडी टॉमी कि.२००/— रूपये ३) आरोपीचा एक मोबाईल कि.१५,०००/— रूपये असा एकूण मुद्देमाल २,६५,२००रू—रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीला अटक करण्यात आली आहे. पाहीजे आरोपीतांचा पोलीस शोध घेत आहे.

उघडकिस आणलेले गुन्हे रू—

१.पो. स्टे. कलमेश्वर अप क्र ३४/२०२५ कलम ३३१(२) ,३०५,६२ भान्यासं

२.पो. स्टे. नरखेड अप.क्र.४९/२०२५ कलम ३३१(४) ,३०५,३(५) भान्यासं

३. पो.स्टे. नरखेड अप.क्र.५०/२०२५ कलम ३३१(४) ,३०५,३(५) भान्यासं

४ पो.स्टे.नरखेड अप.क्र.५१/२५कलम ३३१(४) ,३०५,३(५) भान्यासं

